जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2024
तरुण भारत

विद्यापीठ अंतर्गत लॉ ची परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. बुधवारी बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे) , बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने सुरळीत झाल्या. या परीक्षेला १ हजार २०४ विद्यार्थ्यांपैकी १ हजार २५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १७९ विद्यार्थी अनुपस्थित होते. गैरप्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथकाची स्थापना केली आहे. बुधवारी एकही गैरप्रकार सापडलेला नाही. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2024

पुढारी

विद्यापीठाच्या परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च एप्रिल - २०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू झालेल्या आहेत. बुधवारी लॉ तिसरे वर्ष व पाचव्या वर्षाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी १२०४ विद्यार्थ्यांपैकी १७९ विद्यार्थी अनुपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी परारी पथके स्थापन केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2024

पुण्यनगरी

१०२५ जणांनी दिली विधीची परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी 'बॅचलर ऑफ लॉ' या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने पार पडल्या. या परीक्षांसाठी १ हजार २०४ विद्यार्थ्यांपैकी १७९ विद्यार्थी अनुपस्थित होते, तर १ हजार २५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.